जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

01 NOV 2022

तरूण भारत

# क्लस्टर युनिव्हर्सिटीच्या कुलगुरूपदी डॉ. दिगंबर शिर्के

▪ कर्मवीर भाऊराव पाटील समूह विद्यापीठ (क्लस्टर युनिव्हर्सिटी)ला मान्यता

प्रतिनिधी
कोल्हापूर

सातारा येथील कर्मवीर भाऊराव पाटील समूह विद्यापीठाच्या (क्लस्टर युनिव्हर्सिटी) कुलगुरुपदी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांची निवड करण्यात आली आहे. समूह विद्यापीठ स्थापन करण्याबाबत राज्य सरकारने मे २०२१ मध्ये निर्णय घेतला होता. तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली पाच मे २०२२ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत समूह विद्यापीठ स्थापन करण्यावर शिक्कामोर्तब झाले होता. त्यानुसार कर्मवीर भाउराव पाटील समूह विद्यापीठाला मान्यता मिळाली आहे. या विद्यापीठाचे पहिले कुलगुरू होण्याचा मान शिर्के यांना मिळाला आहे.



केंद्र सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाच्या मार्गदर्शक तत्वानुसार समूह विद्यापीठाची स्थापना करण्यात आली आहे. उच्च शिक्षणाचा दर्जा उंचाविण्यासाठी समूह विद्यापीठ ही संकल्पना राबविली जात आहे. सातारा येथील कर्मवीर भाऊराव पाटील समूह विद्यापीठात यशवंतराव चव्हाण विज्ञान संस्था, धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय सातारा आणि छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचा समूह विद्यापीठात समावेश आहे. ही तिन्ही महाविद्यालये स्वायत्त आहेत. कर्मवीर भाऊराव पाटील समूह विद्यापीठाच्या कुलगुरुपदाची जबाबदारी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे सोपविली आहे. डॉ. शिर्के यांच्याकडे मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरुपदाचा अतिरिक्त कार्यभार आहे. कुलपती कार्यालयाच्या आदेशानुसार उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकास चंद्र रस्तोगी यांनी यासंबंधीचे पत्र प्रसिद्ध केले आहे. डॉ. शिर्के एकाचवेळी तीन विद्यापीठाचे कुलगुरू पद सांभाळत आहेत. ही गोष्ट शिवाजी विद्यापीठासह करवीरवासियांसाठी भूषणावह आहे.

पुढारी

# कर्मवीर भाऊराव पाटील समूह विद्यापीठाच्या कुलगुरूपदी डॉ. शिर्के

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



सातारा येथील कर्मवीर भाऊराव पाटील समूह विद्यापीठाच्या (क्लस्टर युनिव्हर्सिटी) कुलगुरूपदी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची निवड करण्यात आली आहे.

केंद्र सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार समूह विद्यापीठाची स्थापना करण्यात आली आहे. समूह विद्यापीठ स्थापन करण्याबाबत राज्य सरकारने मे २०२१ मध्ये निर्णय घेतला. तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली ५ मे २०२२ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत समूह विद्यापीठ स्थापन करण्याचे ठरले.

सातारा येथील कर्मवीर भाऊराव पाटील समूह विद्यापीठात यशवंतराव चव्हाण विज्ञान संस्था, धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय सातारा आणि छत्रपती शिवाजी महाविद्यालय या तीन स्वायत्त महाविद्यालयांचा समूह विद्यापीठात समावेश आहे. कुलपती कार्यालयाच्या आदेशानुसार उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी यासंबंधीचे राजपत्र प्रसिद्ध केले आहे. कर्मवीर भाऊराव पाटील समूह विद्यापीठाचे पहिले कुलगुरू होण्याचा मान डॉ. शिर्के यांना मिळाला आहे. त्यांच्याकडे शिवाजी विद्यापीठ व मुंबई विद्यापीठाचा कार्यभार आहे.

0 1 NOV 2022
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कर्मवीर भाऊराव पाटील समूह विद्यापीठाच्या कुलगुरूपदी डॉ. शिर्के



डॉ.डी.टी.शिर्के

कोल्हापूर, ता. ३१ : सातारा येथील कर्मवीर भाऊराव पाटील समूह विद्यापीठाचे (क्लस्टर युनिव्हर्सिटी) पहिले कुलगुरू होण्याचा मान शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांना मिळाला. आज त्यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. या विद्यापीठात यशवंतराव चव्हाण विज्ञान संस्था, धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय, सातारा आणि छत्रपती शिवाजी महाविद्यालय या तीन संस्थांचा समावेश आहे.

समूह विद्यापीठ स्थापन करण्याबाबत राज्य सरकारने मे २०२१ मध्ये निर्णय घेतला होता. तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली पाच मे २०२२ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत समूह विद्यापीठ स्थापण्यावर शिक्कामोर्तब झाले. आज कुलगुरूपदासाठी डॉ. शिर्के यांची घोषणा केली. उच्च शिक्षणाचा दर्जा उंचाविण्यासाठी समूह विद्यापीठ ही संकल्पना राबविली जात आहे. केंद्र सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार या विद्यापीठाची स्थापना करण्यात आली आहे. कुलपती कार्यालयाच्या आदेशानुसार उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकास चंद्र रस्तोगी यांनी यासंबंधीचे पत्र प्रसिद्धीस दिले आहे.

## तीन विद्यापीठांचे कुलगुरू

डॉ. डी. टी. शिर्के हे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू आहेत. त्यांच्याकडे मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरूपदाचा अतिरिक्त पदभारही आहे. तसेच आता ते कर्मवीर भाऊराव पाटील समूह विद्यापीठाचे नूतन कुलगुरू झाले आहेत. त्यामुळे सध्या ते तीन विद्यापीठांचे कुलगुरू आहेत.

**“ माझ्या निवडीने शिवाजी विद्यापीठाचा सन्मान झाला आहे. या विद्यापीठाशी संलग्नित असणाऱ्या महाविद्यालयांचे क्लस्टर होऊन विद्यापीठ झाले. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याचा वसा जपणाऱ्या रयत संस्थेत योगदान देण्याची संधी मिळाल्याचे समाधान आहे.**

**- डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू**

लोकमत

# कर्मवीर विद्यापीठाच्या कुलगुरूपदी डॉ. शिर्के

लोकमत न्यूज नेटवर्क

सातारा : कर्मवीर भाऊराव पाटील



समूह विद्यापीठाच्या (क्लस्टर युनिव्हर्सिटी) कुलगुरुपदी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची निवड करण्यात आली आहे. समूह विद्यापीठ स्थापन करण्याबाबत राज्य सरकारने मे २०२१मध्ये निर्णय घेतला होता. तत्कालिन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली पाच मे २०२२ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत समूह विद्यापीठ स्थापन करण्यावर शिक्कामोर्तब झाले होते. कर्मवीर भाऊराव पाटील समूह विद्यापीठाचे पहिले कुलगुरू होण्याचा मान शिर्के यांना मिळाला आहे.

उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी समूह विद्यापीठ ही संकल्पना राबविली जात आहे. केंद्र सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार या विद्यापीठाची स्थापना केली आहे.

कर्मवीर भाऊराव पाटील समूह विद्यापीठाच्या कुलगुरुपदाची जबाबदारी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सोपविली आहे. शिर्के यांच्याकडे मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरुपदाचाही तात्पुरता कार्यभार आहे.

> माझ्या निवडीने शिवाजी विद्यापीठाचा सन्मान झाला आहे. या विद्यापीठाशी संलग्नित असणाऱ्या महाविद्यालयांचे क्लस्टर होऊन विद्यापीठ झाले. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याचा वसा जपणाऱ्या रयत संस्थेत योगदान देण्याची संधी मिळाल्याचे समाधान आहे. दोन दिवसांत पदभार स्वीकारणार आहे.
>
> -डॉ. दिगंबर शिर्के, कुलगुरू

पुण्यनगरी

# कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची निवड

कोल्हापूर : प्रतिनिधी

सातारा येथील कर्मवीर भाऊराव पाटील समूह विद्यापीठाच्या (क्लस्टर युनिव्हर्सिटी) प्रथम कुलगुरुपदी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची निवड करण्यात आली आहे. समूह विद्यापीठ स्थापन करण्याबाबत राज्य सरकारने मे २०२१ मध्ये निर्णय घेतला होता. तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली ५ मे २०२२ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत समूह विद्यापीठ स्थापन्यावर शिक्कामोर्तब झाले होते. त्यामुळे कर्मवीर भाऊराव पाटील समूह विद्यापीठाचे पहिले कुलगुरू होण्याचा मान शिर्के यांना मिळाला आहे.

उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी समूह विद्यापीठ ही संकल्पना राबवली जात आहे. केंद्र सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार या विद्यापीठाची स्थापना करण्यात आली आहे. सातारा येथील कर्मवीर भाऊराव पाटील समूह विद्यापीठात यशवंतराव चव्हाण विज्ञान संस्था, धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय सातारा आणि छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचा समूह विद्यापीठात समावेश आहे. ही तीनही कॉलेज स्वायत्त आहेत. डॉ. शिर्के यांच्याकडे मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरुपदाचा तात्पुरता कार्यभार आहे. कुलपती कार्यालयाच्या आदेशानुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी यासंबंधीचे पत्र प्रसिद्धीस दिले आहे.

सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी ध्वज दाखवून एकता दौडला प्रारंभ केला.

# एकता, सद्भावनेची विद्यापीठात शपथ

कोल्हापूर, ता. ३१ : भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती आणि माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांचा स्मृतिदिन आज शिवाजी विद्यापीठात विविध उपक्रमांनी झाला. या निमित्ताने त्यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत एकता दौडही आयोजित करण्यात आली. शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात आज सकाळी सरदार वल्लभभाई पटेल आणि इंदिरा गांधी यांच्या प्रतिमांचे पूजन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. तत्पूर्वी, विद्यापीठ प्रांगणात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य पुतळ्यापासून एकता दौड आयोजित करण्यात आली. कुलगुरू डॉ. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी



ध्वज दाखवून दौडचे उद्घाटन केले. दौडीनंतर सर्व उपस्थितांना एकता व सद्भावना यांची शपथ देण्यात आली. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना संचालक अभय जायभाये, डॉ. पी. टी. गायकवाड, स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँन्ड टेक्नॉलॉजीचे डॉ. किरण कुमार शर्मा यांच्यासह विविध महाविद्यालयांचे एनएसएस समन्वयक, शिक्षक आणि स्वयंसेवक संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
01 NOV 2022 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'बेटी बचाओ' समन्वयकांसाठी एक दिवसीय कार्यशाळा

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठामध्ये 'बेटी बचाओ'. अभियानांतर्गत अधिविभागातील व संलग्नित महाविद्यालयातील बेटी बचाओ समन्वयक, समन्वयिकांसाठी एक दिवशीय कार्यशाळा झाली.

कार्यशाळेचे उद्घाटन कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांच्या उपस्थित झाले. कुलगरू डॉ. शिर्के म्हणाले, 'मुलींच्या शिक्षणाला महत्त्व दिले पाहिजे. कारण शिक्षणातून मुलींना आत्मविश्वास येतो. विद्यापीठ व महाविद्यालय मुलींना शिक्षणाच्या प्रभावात जास्तीत जास्त आणण्यासाठी प्रयत्न करावेत.'

कार्यशाळेत डॉ. भारती पाटील, डॉ. संगीता देसाई, जिल्हा परिषद महिला बालविकास अधिकारी शिल्पा पाटील, सामाजिक कार्यकर्ते संजय देशपांडे यांनी मनोगत व्यक्त केले. समन्वयिका डॉ. प्रतिभा देसाई यांनी आभार मानले.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठातर्फे एकता दौड

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती व माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांचा स्मृतिदिन या निमित्ताने त्यांच्या स्मृतींना शिवाजी विद्यापीठात अभिवादन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत एकता दौड आयोजित करण्यात आली.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात सरदार वल्लभभाई पटेल व इंदिरा गांधी यांच्या प्रतिमांचे पूजन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते झाले. तत्पूर्वी, विद्यापीठ प्रांगणात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापासून एकता दौड काढण्यात आली. कुलगुरू डॉ. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी ध्वज दाखवून उद्घाटन केले. दौडीनंतर सर्व उपस्थितांना एकता व सद्भावना यांची शपथ देण्यात आली. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. शरद बनसोडे, डॉ. आर. व्ही. गुरव, अभय जायभाये आदी उपस्थित होते.

01 NOV 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ निवडणुकीची छाननी पूर्ण

## बिनविरोधमध्ये विद्यापीठ विकास आघाडीसह 'सुटा'ची बाजी : अपील सुनावणीनंतर यादी जाहीर होणार

**प्रतिनिधी**
**कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठ निवडणुकीचा महत्वाचा टप्पा म्हणजे विविध अधिकार मंडळाच्या उमेदवारी अर्जांची छाननी सोमवारी पूर्ण झाली. छाननी प्रक्रिये दरम्यान शिक्षक मतदार संघ, अभ्यास मंडळ, संस्थापक, प्राचार्य, विभागप्रमुख यासह अन्य मतदारसंघात विद्यापीठ विकास आघाडीसह 'सुटा'ने बिनविरोधमध्ये बाजी मारली आहे. असे असले किती अर्ज पात्र-अपात्र ठरले हे कुलगुरूंकडे केलेल्या अपीलावर सुनावणीनंतर ठरणार आहे. पात्र-अपात्र उमेदवारांची कच्ची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर रात्री उशीरा जाहीर केली आहे. त्यामुळे सुनावणीनंतरच अंतिम उमेदवार पात्रता यादी जाहीर केली जाणार आहे.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील निवडणूक अर्जांची छाननी करताना अधिकारी.**

विद्यापीठातील विविध अधिकार मंडळाच्या उमेदवारी अर्जांची छाननी प्रक्रिया सोमवारी पार पडली. छाननी दरम्यान काही उमेदवारांनी दोन ते चार अर्ज भरल्याचे आढळून आले. काहींचे सर्वच अर्ज पात्र ठरले असले तरी उमेदवार मात्र एकच राहणार आहे. ज्यांनी छाननी संदर्भात कुलगुरूंकडे अपील केले आहे, त्या अपीलांवर सुनावणी झाल्यानंतरच एकूण अर्जांपैकी किती पात्र अपात्र हे विद्यापीठ प्रशासन जाहीर करणार आहे. सुटा व विद्यापीठ विकास आघाडीने भरलेले अर्जांपैकी काही उमेदवारी अर्ज पात्र तर काही अपात्र ठरले आहेत. त्याचबरोबर शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी कृती समितीने पदवीधरसाठी भरलेल्या १३ उमेदवारी अर्जांपैकी ८ उमेदवारी अर्ज पात्र ठरले आहेत. शिव-शाहू आघाडीने पदवीधरसाठी भरलेल्या १० पैकी ९ उमेदवारी अर्ज पात्र ठरले तर १ अर्ज अपात्र ठरला आहे. त्यामुळे शिव-शाहू आघाडी कुलगुरूंकडे अपील करणार आहे. बऱ्याच जागा बिनविरोध झाल्या असल्या तरी अर्ज माघारी आणि सुनावणीनंतरच खरे चित्र स्पष्ट होणार आहे.सर्वच संघटनांच्या प्रचार बैठका रात्री उशिरापर्यंत सुरू होत्या.

### शिक्षक व अभ्यास मंडळाच्या ८ जागा सुटाकडे

छाननीनंतर अधिसभा शिक्षक दोन, अभ्यास मंडळातील इतिहास अभ्यास मंडळाच्या तीन, रसायनशास्त्र अभ्यास मंडळ दोन तर राज्यशास्त्र एक अशा आठ जागा बिनविरोध मिळाल्या आहेत, असे सुटाचे म्हणणे आहे.

### प्राचार्य आणि संस्थाचालक मतदारसंघ विद्यापीठ विकास आघाडीकडेच

विद्यापीठातील प्राचार्य आणि संस्थाचालक मतदारसंघासाठी विद्यापीठ विकास आघाडीच्याच उमेदवारांचेच अर्ज आहेत. त्यामुळे या मतदारसंघावर विद्यापीठ विकास आघाडीचेच वर्चस्व राहणार आहे. तर इतर मतदारसंघात निवडणुका लागणार आहेत, असे सध्याच्या चित्र आहे.

### अर्ज माघारीचा आज शेवट दिवस

आज (दि. १) विद्यापीठ निवडणुकीतील उमेदवारी अर्ज माघार घेतले जातील. त्यानंतर २ नोव्हेंबर सायंकाळी ५ वाजेपर्यंत उमेदवारी अर्जांच्या वैधतेबाबत कुलगुरूंकडे तक्रार करावयाची आहे. या तक्रारीवर सुनावणी झाल्यावर ३ नोव्हेंबर रोजी अंतिम पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द होईल. १४ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत प्रत्यक्ष मतदान होईल. १६ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजल्यापासून मतमोजणीला सुरुवात होणार आहे.

लोकमत

# सिनेट निवडणुकीची आज माघार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा (सिनेट) आणि विविध अधिकार मंडळाच्या निवडणुकीसाठी दाखल झालेल्या एकूण ५०१ उमेदवारांच्या अर्जांच्या छाननीची प्रक्रिया सोमवारी पूर्ण झाली. आज, मंगळवारी माघारीची मुदत आहे. अपिलांवर सुनावणी होऊन बुधवारी उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध होणार आहे.

राजर्षी शाहू सभागृहात सकाळी ११ वाजता अर्जांच्या छाननीची प्रक्रिया सुरू झाली. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, उपकुलसचिव संजय कुबल, भक्ती नाळे, सहायक कुलसचिव सुरेश बंडगर यांनी प्रक्रिया राबविली. सूचक-अनुमोदक यांचा चुकीचा क्रम, पत्त्यामधील त्रुटींमुळे अनेक अर्ज अवैध ठरले. आजी-माजी विद्यार्थी कृती समितीचे पदवीधर गटातील ८, शिव-शाहू आघाडीचे ९ अर्ज वैध ठरले आहेत.

पुण्यनगरी

# अधिसभा निवडणूक छाननी प्रक्रिया पूर्ण

## उद्या होणार चित्र स्पष्ट : आज अर्ज माघारीचा अंतिम दिन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकीसाठी सोमवारी छाननी प्रक्रिया पूर्ण झाली. विद्यापीठ प्रशासनामार्फत रात्री उशिरापर्यंत संकेतस्थळावर छाननी झालेले अर्ज प्रसिद्ध करण्यात येत होते. आज मंगळवार (दि.१) निवडणूक अर्ज माघारीचा अंतिम दिवस असल्यामुळे उद्या बुधवारी (दि.२) एकूणच निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार आहे.

अधिसभा निवडणुकीसाठी ३९ प्रतिनिधींसाठी २९० अर्ज, शिक्षक प्रतिनिधींच्या १० जागांसाठी ५९ अर्ज, विद्यापीठ शिक्षक प्रतिनिधींसाठी २५ अर्ज, विद्या परिषद शिक्षक प्रतिनिधींसाठी २७ अर्ज, तर अभ्यास मंडळावर १८४ अर्ज प्राप्त झाले होते. पदवीधर प्रतिनिधींसाठी सर्वाधिक १० जागांसाठी १६४ अर्ज प्रशासनाला प्राप्त झाले होते. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार त्यापैकी २ अर्ज छाननीवेळी बाद झाले. दरम्यान, निवडणुकीसाठी सुटाच्या ८ जागा बिनविरोध झाल्या आहेत. तक्रारदारांनी केलेल्या अपिलावर निवडणूक निर्णय अधिकारी, कुलगुरू यांच्यामार्फत सुनावणी झाल्यानंतरच अर्ज पात्र-अपात्र संख्या बुधवारी जाहीर होणार आहे, अशी माहिती प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली.

सकाळ

# विद्यापीठ निवडणुकीत काही जागा बिनविरोध

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या निवडणूक प्रक्रियेतील उमेदवार अर्ज छाननी प्रक्रिया आज पार पडली. यामध्ये शिक्षक आणि पदवीधर गटातील दोन अर्ज बाद झाले. एकूण चार अर्ज बाद झाले. बुधवारी (ता. २) अंतिम उमेदवारांची यादी जाहीर केली जाणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा आणि विविध प्राधिकरणाची निवडणूक प्रक्रिया सध्या सुरू आहे. आज उमेदवारी अर्जाची छाननी करण्यात आली. यामध्ये दुपारपर्यंत चार अर्ज बाद झाल्याची माहिती समजली. यामध्ये शिक्षक आणि पदवीधर गटातील अर्ज आहेत. या शिवाय विद्या परिषद, अभ्यास मंडळे या जागांवरही अर्ज बाद झाल्याने बऱ्याच जागा बिनविरोध झाल्या आहेत.

जनसंपर्क कक्ष
01 NOV 2022
पुढारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षण केंद्राच्या अभ्यासक्रम प्रवेशासाठी मुदतवाढ

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राची शैक्षणिक वर्ष २०२२-२३ ची बी.ए., बी.कॉम, एम.ए.(मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास), एम.कॉम., एम.एस्सी. (गणित) अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेस दि.१५ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, अशी माहिती संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी दिली.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने बारावी पुनर्परीक्षेचा निकाल जाहीर केला आहे. अशा उत्तीर्ण विद्यार्थ्यांना दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या ८७ अभ्यासकेंद्रांत प्रवेशाची संधी मिळणार आहे. विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर Distance Education लिंकवर प्रवेशाची जाहिरात उपलब्ध आहे. http://sukapps.unishivaji.ac.in/studentregistration/##/ या ऑनलाईन लिंकवर प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन केले आहे.

01 NOV 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कबड्डी स्पर्धेत शाहू कॉलेज प्रथम

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या आंतरविभागीय पुरुष गटातील कबड्डी स्पर्धेत राजर्षी छत्रपती शाहू कॉलेजने प्रथम क्रमांक पटकविला.

स्पर्धेचे उद्‌घाटन प्रा. संभाजी पाटील, प्राचार्य डॉ. एल. डी. कदम, डॉ. रमेश भेंडगिरी यांच्या हस्ते झाले. शाहू कॉलेजने इचलकरंजीच्या नाईट कॉलेजवर विजय मिळवत प्रथम क्रमांक पटकाविला. नाईट कॉलेज द्वितीय, तर रहिमतपूर (जि. सातारा) येथील सरदार बाळासाहेब माने महाविद्यालय तृतीयस्थानी राहिले.



आंतरविभागीय कबड्डी स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविणाऱ्या राजर्षी छत्रपती शाहू कॉलेजच्या संघाला पोपट पाटील यांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविले. यावेळी भगवान पवार, बाबासो उलपे, संजय पाटील, विक्रमसिंह नांगरे उपस्थित होते.